वाचा :- १)म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन आरोग्य/अस्था५/१८०३/२०१५ दि.२६/१०/१५
२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील नेमणुक आदेश क्रमांक आरोग्य /अस्था५/ ८७१/२०१६ दि.५/८/२०१६
३) सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-१८१/२०१७ दि.१५/४/२०१७
४) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोंटिस क्रमांक आरोग्य/अस्था५/१२३०/२०१७ दि.१८/९/२०१७
५) श्रीम.पगार,आरोग्य सेविका यांचा अं.का.दा.नोंटिसीस खुलासा दि.९/१०/२०१७
६) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :- १० / १० /२०१७

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
जा.क्र.आरोग्य/अस्था५/१३०५/२०१७
नाशिक दिनांक: १० /१० /२०१७

## आदेश

श्रीम.वैशाली दादाजी पगार,आरोग्य सेविका, प्रा.आ.केंद्र मोहाडी.ता.दिंडोरी येथे कार्यरत असताना मानव विकास कार्मक्रमांतर्गत मातांना बुडीत मजुरीपोटिचे धनादेश वाटप करण्यास नकार दिलेबाबत नियमबाहय वर्तन केलेचे निदर्शनास आल्याने ज्ञापन क्र.आरोग्य/अस्था५/१८०३/२०१५ दि.२६/१०/२०१५ अन्वये खालीलप्रमाणे खातेचौकशी सुरु करण्यात आली.

**१) लाभार्थींना शासनाच्या अनुदानापासुन वंचित ठेवुन शासकीय योजनेचा/कार्यक्रमांचा उद्देश सफल होणेबाबत अडथळा आणणे .**
**२) वरिष्ठांच्या आदेशाचे अवमानना करणे.**

प्रस्तुत ज्ञापन व परिशिष्ट१ ते ४ हे श्रीम.वैशाली दादाजी पगार आरोग्य सेविका (म) यांना बजाविणेत आल्याने विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला नसल्याने प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्रजिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ चा नियम ६ (३) नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र आरोग्य/अस्था५/८७१/२०१६ दि.५/८/२०१६ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांची नेमणुक करणेत आलेली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-१८१/१७ दि.१५/४/२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालात नमुद केलेनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील अंतिम कारणे दाखवा नोंटिस आरोग्य/अस्था५/१२३०/२०१७ दि.१८/९/२०१७ अन्वये श्रीम.पगार आरोग्य सेविका (म) यांना महाराष्ट्रजिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ भाग तीन - चे नियम ४ (२) नुसार **पुढील एक वेतनवाढ भावी वेतनवाढीवर कामयस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने बंद करणेची कारवाई का करणेत येवु नये? याबाबत विचारणा करण्यात येवुन दि.९/१०/२०१७ रोजी खुलासा मागविणेत आला होता.**

प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोंटिसीचे आदेशास श्रीम. पगार,आरोग्य सेविका (म) यांनी खुलासा दि.९/१०/२०१७ रोजी सादर केलेला आहे. सदर खुलाशात नमुद केलेनुसार दोषारोप मान्य नसलेने अं.का.दा.नोंटिसीत शिक्षा अंतिम न करता निर्दोष घोषित करुन प्रकरण बंद करावे अशी विनंती केलेली आहे.तरी सर्व परिस्थिती विचारात घेता सदर प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मी.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग-तीन कलम ४( ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्रीम.वैशाली दादाजी पगार,आरोग्य सेविका (म) यांना -----**
एक वेतनवाढ तात्पुरती एक वर्षासाठी रोखण्याची ----- **शिक्षा देत आहे.**

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.वैशाली दादाजी पगार,आरोग्य सेविका(म) यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**श्रीम.वैशाली दादाजी पगार आरोग्य सेविका (म),प्रा.आ.केंद्र मोहाडी, उपकेंद्र जानोरी ता.दिंडोरी**
**व्दारा:- गटविकास अधिकारी पंचायत समिती दिंडोरी**

**प्रत:- गटविकास अधिकारी पंचायत समिती दिंडोरी**

**२/-** समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्रीम.पगार आरोग्य सेविका (म) यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रत:- अस्थापना विभाग -५ आरोग्य विभाग जि.प.नाशिक**

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नाशिक**